**प्रसिध्दी पत्रक** दिनांक २१/०५/२०२४

**आरोपी लोकसेवक**- श्री मारुती रघुनाथ केदार, वय 34 वर्षे, पद- नोकरी, पोलीस हवालदार, नेमणुक पोलीस ठाणे चकलांबा, ता.गेवराई, जि. बीड, रा.चकलांबा, ता.गेवराई जि.बीड, (वर्ग-3),यांनी तक्रारदार यांच्याकडून 5000/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळ्यात.

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपतप्रतिबंधक विभाग | :- | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे चकलांबा, जि.बीड येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| आरोपी यांचे नाव व पत्ता | :- | श्री मारुती रघुनाथ केदार, वय 34 वर्षे, नोकरी, पोलीस हवालदार, नेमणुक पोलीस ठाणे चकलांबा, ता. गेवराई, जि. बीड, रा.चकलांबा, ता.गेवराई जि. बीड, (वर्ग-3), |
| लाच मागणी रक्कम | :- | 5000/- रुपये. |
| लाच स्विकृती रक्कम | | 5000/-रुपये. |
| सापळा अधिकारी | :- | श्री. विजयमाला चव्हाण, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर |
| सहाय्यक सापळा अधिकारी | :- | श्री. अमोल धस, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार व त्यांचे चुलते यांच्यातील शेतीच्या वादातुन झालेल्या भांडणामुळे चकलांबा पोलीस ठाणे येथे परस्पर विरोधी अदखलपात्र गुन्ह्याची नोंद झाली होती. त्यामध्ये प्रतिबंधक कारवाहीमध्ये मदत करण्यासाठी. |
| थोडक्यात माहिती | | यातील तक्रारदार व त्यांचे चुलते यांच्यातील शेतीच्या वादातुन झालेल्या भांडणामुळे चकलांबा पोलीस ठाणे येथे परस्पर विरोधी अदखलपात्र गुन्ह्याची नोंद झाली होती. त्यामध्ये प्रतिबंधक कारवाहीमध्ये मदत करण्यासाठी. आ.लो.से श्री मारुती केदार पोह यांनी तक्रारदार यांच्याकडे 5000/- रुपये लाचेची मागणी करित असल्याने, तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर या कार्यालयात तक्रार दिली.<br>तक्रारदार यांचे तक्रारीवरुन दि.21/05/2024 रोजी पंचासमक्ष केलेल्या लाच मागणी पडताळणी दरम्यान आ.लो.से. श्री मारुती केदार, पोह यांनी तक्रारदार यांचेकडे पंचासमक्ष 5000/-रुपये लाचेची रक्कम मागणी करुन स्विकारणे बाबत निष्पन्न झाले.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर तर्फे आजच दि. 21/05/2024 रोजी सापळा आयोजीत केला असता, आ.लो.से. श्री मारुती केदार, पोह यांनी तक्रारदार यांचेकडून पंच साक्षीदारा समक्ष 5000/- रुपये लाचेची रक्कम स्विकारली आहे. लाचेच्या रकमेसह त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. पोलीस स्टेशन चकलांबा, ता.गेवराई जि.बीड येथे तक्रारदार यांचे फिर्यादी वरुन गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.संदिप आटोळे, अपर पोलीस अधीक्षक मुकूंद आघाव, पोलीस उप अधीक्षक राजीव तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्रीमती विजयमाला चव्हाण, सहाय्यक सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री अमोल धस यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पोलीस हवालदार राजु सिनकर, पो.अं. युवराज हिवाळे चालक चंद्रकांत शिंदे यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर

ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,

पोलीस अधीक्षक :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 9881460103

पोलीस उप अधीक्षक :- 9823498777

( राजीव तळेकर )
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
छत्रपती संभाजीनगर.